**पाहिजेत**
ITI इलेक्ट्रिशीयन/वायरमन, 12 वी पास पाहिजेत
नामांकित कंपनी साठी सबस्टेशन कामासाठी शिक्षण ITI इलेक्ट्रिशीयन/ वायरमन, 12 वी पास फ्रेश/ अनुभवी मुले त्वरित पाहिजे.
संपर्क - 9923155996

दैनिक सोलापूर
असत्याच्या दुनियेतील सत्य शोधणारे सायं दैनिक
# कटूसत्य
किंमत ५ रुपये
Email - katusatya@gmail.com
www.katusatyanews.com

**शैक्षणिक**
शासकीय कौशल्य विकास बोर्डाच्या कोर्सेसना प्रवेश
इलेक्ट्रिकल सुपरवायझर, इलेक्ट्रिकल वायरमन, मोटर वाइंडिंग, ऑटोमोबाइल मैकेनिक टेक्नीशियन, टू थ्री फोरव्हीलर मैकेनिक, कम्प्यूटर ऑपरेटर, कम्प्यूटर पीसी मेंटेनेंस, एसी मैकेनिक, प्लंबर, फिटर, वेल्डर पात्रता 10 वी/ 12 वी पास / नापास कॉलेजचे विद्यार्थी, कामगार / कर्मचारी यांनाही प्रवेश
ST पास ची, प्लेसमेंट ची, वायरमन लायसन ची सोय
पाटील इलेक्ट्रॉनिक इन्स्टिट्यूट, राधिका रोड, सातारा
मोबाईल 9822097071 | वर्ष ४० वे

सोलापूर | RNI No . MAHMAR 2006/17624 | वर्ष २० वे, अंक २७४ वा | गुरुवार, दि. ११ जून २०२६ | पाने: ४ | पोष्ट परवानाः - SLP/04/2026-2028 Posted at - R.M.S.Post Office SOLAPUR

# 130 कोटींच्या थकीत ऊस बिलासाठी शेतकऱ्यांचे जलसमाधी आंदोलन

## गोकुळ कारखान्यावर जप्तीची टांगती तलवार

## सोलापूरात शेतकरी आंदोलन विकोपाला!

**सोलापूर, (कटूसत्य वृत्त):-** गोकुळ सहकारी साखर कारखान्याकडील तब्बल 130 कोटी रुपयांच्या थकीत ऊस बिलासाठी शेतकऱ्यांचा संघर्ष आता निर्णायक टप्प्यावर पोहोचला आहे. गेल्या 17 दिवसांपासून जुन्या जिल्हाधिकारी कार्यालयासमोर उपोषण करणाऱ्या शेतकऱ्यांनी बुधवारी प्रशासनाच्या निष्क्रियतेविरोधात आक्रमक भूमिका घेत थेट छत्रपती संभाजी महाराज तलावात उतरून जलसमाधी आंदोलन केले. या आंदोलनामुळे संपूर्ण जिल्ह्यात खळबळ उडाली असून प्रशासनाचीही मोठी धावपळ झाली.

गोकुळ साखर कारखान्याने 2025-26 च्या गाळप हंगामातील ऊस पुरवठादार शेतकऱ्यांची एफआरपीची रक्कम अद्याप अदा केलेली नाही. त्यामुळे सोलापूर आणि धाराशिव जिल्ह्यातील शेकडो शेतकरी गेल्या 17 दिवसांपासून जिल्हाधिकारी कार्यालयासमोर उपोषण करत आहेत. मात्र, शासन आणि प्रशासनाकडून ठोस निर्णय न झाल्याने संतप्त झालेल्या शेतकऱ्यांनी जलसमाधी आंदोलनाचा मार्ग स्वीकारला.

**'आम्ही हक्काचे पैसे मागतोय, भीक नाही'**

आज सकाळी मोठ्या संख्येने शेतकरी मोर्चाच्या स्वरूपात छत्रपती संभाजी महाराज तलावाकडे रवाना झाले. पोलिसांनी त्यांना रोखण्याचा प्रयत्न केला. मात्र, संतप्त शेतकऱ्यांनी सुरक्षा घेरा भेदून तलाव गाठला. "आम्ही आमच्या कष्टाचे पैसे मागतोय, भीक नाही", "ऊस बिल द्या, अन्यथा कारखाना जप्त करा" अशा घोषणांनी परिसर दणाणून गेला.

अनेक शेतकरी तलावात उतरले तर काहींनी निषेध म्हणून पाण्यात उड्या घेतल्या. परिस्थिती गंभीर बनताच पोलिस आणि महसूल प्रशासनातील वरिष्ठ अधिकारी घटनास्थळी दाखल झाले.



**प्रशासकीय अधिकारीही उतरले तलावात**

परिस्थिती नियंत्रणात आणण्यासाठी दक्षिण सोलापूरचे प्रांताधिकारी सुमित शिंदे आणि तहसीलदार किरण जमदाडे यांनी स्वतः तलावात उतरून आंदोलक शेतकऱ्यांशी संवाद साधला. प्रशासनाकडून थकीत रकमेबाबत सकारात्मक कार्यवाही सुरू असल्याचे सांगत आंदोलन मागे घेण्याचे आवाहन करण्यात आले. मात्र, शेतकऱ्यांनी थकीत ऊस बिलाची खात्रीशीर हमी मिळाल्याशिवाय आंदोलन मागे घेण्यास नकार दिला.

**दोन वर्षांपासून विनापरवाना गाळपाचा आरोप**

आंदोलक शेतकऱ्यांच्या म्हणण्यानुसार, गोकुळ साखर कारखान्याने गेल्या दोन वर्षांपासून आवश्यक परवानग्यांशिवाय गाळप केल्याचा आरोप आहे. त्याचबरोबर शेतकऱ्यांच्या ऊस बिलाची रक्कमही थकवण्यात आली आहे. या प्रकरणी अनेक वेळा निवेदने, आंदोलने आणि उपोषणे करूनही कारखाना व्यवस्थापनाकडून कोणताही सकारात्मक प्रतिसाद मिळाला नसल्याचा आरोप शेतकरी संघटनांनी केला आहे.

**कारखान्याविरोधात आरआरसीची कारवाई सुरू**

महसूल विभागाने गोकुळ साखर कारखान्याविरोधात महसूल वसुली प्रमाणपत्र (RRC) अंतर्गत कारवाई सुरू केली आहे. या प्रक्रियेत आतापर्यंत सहापैकी दोन नोटिसा बजावण्यात आल्या आहेत. उर्वरित नोटिसांची प्रक्रिया पूर्ण होण्यासाठी आणखी काही काळ लागू शकतो. विशेष म्हणजे, प्रशासनाने बजावलेल्या दोनही नोटिसांना कारखान्याचे अध्यक्ष दत्ता शिंदे यांनी अद्याप कोणतेही उत्तर दिले नसल्याची माहिती समोर आली आहे. याशिवाय चेन्नईस्थित एका कंपनीची तब्बल 15 कोटी रुपयांची फसवणूक केल्याप्रकरणीही कारखान्यावर गुन्हा दाखल असल्याची माहिती समोर आली आहे.

**कारखान्याची मालमत्ता जप्त होण्याची शक्यता**

दरम्यान, साखर आयुक्त संजय कोलते यांनी राज्यातील थकीत एफआरपीबाबत भूमिका स्पष्ट केली आहे. राज्यात सध्या 677 कोटी रुपयांची एफआरपी थकीत असून सात साखर कारखान्यांना जप्तीच्या नोटिसा बजावण्यात आल्या आहेत. त्यामध्ये गोकुळ सहकारी साखर कारखान्याचाही समावेश आहे. गोकुळ कारखान्याकडे शेतकऱ्यांची 130 कोटी रुपयांची एफआरपी थकीत असल्याने आवश्यक प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर कारखान्याची मालमत्ता जप्त करून त्यातून शेतकऱ्यांची देणी अदा करण्याची कारवाई केली जाऊ शकते, असे संकेत साखर आयुक्तांनी दिले आहेत.

**शेतकऱ्यांचा इशारा; संघर्ष आणखी तीव्र होणार?**

17 दिवसांच्या उपोषणानंतरही ठोस निर्णय न झाल्याने शेतकरी आता अधिक आक्रमक झाले आहेत. जलसमाधी आंदोलनानंतरही प्रशासनाने तत्काळ निर्णय घेतला नाही तर आंदोलन आणखी तीव्र करण्याचा इशारा आंदोलकांनी दिला आहे. त्यामुळे गोकुळ साखर कारखान्याच्या थकीत ऊस बिलाचा प्रश्न आता केवळ आर्थिक न राहता राजकीय आणि सामाजिकदृष्ट्याही संवेदनशील बनला आहे.

शेतकऱ्यांच्या घामाच्या पैशासाठी सुरू झालेला हा लढा आता निर्णायक टप्प्यावर पोहोचला असून शासन, प्रशासन आणि कारखाना व्यवस्थापन यांच्यासमोर मोठे आव्हान उभे राहिले आहे. आगामी काही दिवसांत या प्रकरणात काय घडामोडी होतात याकडे संपूर्ण राज्याचे लक्ष लागले आहे.

## दुर्गराज रायगडाचे संवर्धन हाच माझा ध्यास : युवराज संभाजीराजे छत्रपती





**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** दुर्गराज रायगडाचे अखेरच्या श्वासापर्यंत संवर्धन हाच माझा ध्यास आहे, असे प्रतिपादन अखिल भारतीय शिवराज्याभिषेक महोत्सव समितीचे मार्गदर्शक युवराज संभाजीराजे छत्रपती यांनी आज येथे केले.

दुर्गराज रायगडावर अखिल भारतीय शिवराज्याभिषेक महोत्सव समितीतर्फे आयोजित शिवराज्याभिषेक सोहळ्यात ते बोलत होते. त्यांनी रायगड संवर्धनाचा ठाम निर्धार व्यक्त करत स्वराज्यविचार, लोककल्याण आणि ऐतिहासिक वारसा जतन करण्याचा संदेश दिला.

संभाजीराजे म्हणाले, हा गड केवळ वास्तू नसून शिवछत्रपतींच्या स्वराज्यनिर्मितीचा साक्षीदार आहे, सर्व शाह्यांना पायाखाली तुडवून उभे राहिलेले स्वराज्य आणि

लोककल्याणाचा विचार हाच खरा शिवविचार आहे. आताचा काळ हा शिवरायांचे सुराज्य नाही. सुराज्य साकारायचे असेल तर त्यासाठी शिवभक्तांची साथ महत्त्वाची आहे.

ते म्हणाले, रायगडावर लवकरच लाईट अँड साऊंड शो होणार आहे. शिवभक्तांनी साथ द्यावी रायगडाचा विकास जोमाने करू. प्रतिकूल परिस्थिती असूनही शिवभक्तांची लक्षणीय गर्दी उसळणे शिवरायांचा वारसा जपण्याचे द्योतक आहे.

आमदार अनिकेत तटकरे, डॉ. डी. वाय. पाटील अभिमत विद्यापीठाचे कुलपती डॉ. संजय डी. पाटील, आमदार मंगेश चव्हाण, आमदार आभिजित पाटील, जिल्हा परिषद अध्यक्ष मंगेश वाकडीकर, जिल्हाधिकारी किशन जावळे, जिल्हारिपदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी नेहा भोसले, रायगड जिल्हा पोलिस अधिक्षक आंचल दलाल, जिल्हापरिषद सदस्य, समिती कार्याध्यक्ष हेमंत साळोखे, माजी अध्यक्ष फत्तेसिंह सावंत, उपाध्यक्ष सत्यजित भोसले, अतुल चव्हाण, चैत्राली कारेकर, प्रशांत दरेकर, सचिव अमर पाटील, समिती सदस्य संतोष जाधव व सर्व समिती सदस्य उपस्थित होते. समितीचे अध्यक्ष संदीप खांडेकर यांनी प्रास्ताविक केले, कार्याध्यक्ष सुखदेव गिरी यांनी स्वागत केले तर संजय पोवार यांनी आभार मानले. दरम्यान, संयोगीताराजे छत्रपती यांनी शिवभक्तांशी संवाद साधला व सोहळा यशस्वी यशस्वी करणाऱ्या शिवभक्तांच्या पाठीवर शाबासकीची थाप दिली. त्यांनी सर्व शिवभक्तांची आपुलकीने चौकशी केली.

**दृष्टीक्षेपात......**

- शिवभक्तांच्या प्रचंड गर्दीने रायगड गजबजला
- छत्रपती शिवाजी महाराज व जिजाऊंच्या पालख्या राजसदरेवर वाजतगाजत दाखल - सकाळी सात वाजता पोवाड्यांनी दरबार दणाणला
- शहाजीराजे छत्रपती यांच्या हस्ते नगारखान्यासमोर ध्वजवंदन
- कृपावर्त तलाव परिसरातील मंदिरात शिवलिंगपूजन संभाजीराजे व शहाजीराजे यांचे राजसदरेवर आगमन व उत्सवमूर्तीचे पूजन
- मेघडंबरीतील शिवछत्रपतींच्या पुतळ्यास सुवर्णमुद्रांचा अभिषेक - मेघडंबरी व शिवसमाधी परिसरात शिवभक्तांची गर्दी
- रात्री उशिरापर्यंत गडावरून उतरण्यासाठी शिवभक्तांच्या रांगा

## अंजुमने इस्लाहूल मुस्लिमीन संस्थेतर्फे शनिवारी अल्पसंख्याक समाजातील विद्यार्थ्यांचा गुणगौरव

### वक्फ बोर्डाचे अध्यक्ष समीर काझी उपस्थित राहणार

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** अंजुमने इस्लाहूल मुस्लिमीन, फॉरेस्ट (सोलापूर) या संस्थेतर्फे अल्पसंख्याक समाजातील दहावी व बारावी परीक्षेत यश मिळविलेल्या विद्यार्थ्यांचा गुणगौरव सोहळा शनिवार, दि. १३ जून रोजी सकाळी ११.३० वाजता आयोजित करण्यात आला आहे. या कार्यक्रमात गुणवंत विद्यार्थ्यांना सन्मानपत्र व स्मृतिचिन्ह देऊन गौरविण्यात येणार आहे, अशी माहिती संस्थेचे सचिव मोहम्मद शेख यांनी पत्रकार परिषदेत दिली.



महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळाचे अध्यक्ष समीर काझी यांच्या अध्यक्षतेखाली हा कार्यक्रम होणार असून, खा. प्रणिती शिंदे, खा. डॉ. ज्योती वाघमारे , पोलीस आयुक्त एम. राजकुमार यांची प्रमुख उपस्थिती राहणार आहे. यावेळी पोलीस आयुक्त हे विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करणार आहेत,

कार्यक्रमानंतर वक्फ मंडळाचे अध्यक्ष समीर काझी हे सोलापूर शहर व जिल्ह्यातील वक्फ मालमत्तांच्या व्यवस्थापनाशी संबंधित ट्रस्टी व पदाधिकाऱ्यांशी संवाद साधून विविध विषयांवर मार्गदर्शन करणार आहेत. अंजुमने इस्लाहूल मुस्लिमीन ही संस्था गेल्या ७५ वर्षांपासून धार्मिक, शैक्षणिक व सामाजिक क्षेत्रात कार्यरत आहे. संस्थेच्या ज्येष्ठ संचालकांनी कार्यभार नव्या पिढीकडे सोपवल्यानंतर युवा संचालकांच्या माध्यमातून अल्पसंख्याक समाजातील कष्टकरी व गरजू नागरिकांना मदत करण्याबरोबरच गुणवंत विद्यार्थी आणि विविध क्षेत्रांत उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या तरुणांचा गौरव करण्याचे उपक्रम सातत्याने राबविले जात आहेत.

या पत्रकार परिषदेला हाजी शकील शेख, ॲड. मो. ईसा शेख, मोहसिन बेरिया आदी पदाधिकारी उपस्थित होते.

## सर्व महाविद्यालयांत विद्यार्थ्यांसाठी 'बायोमेट्रिक' बंधनकारक

### सोलापूर विद्यापीठाचा निर्णय; विद्यापीठाकडून प्राचार्यांना सूचना

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** शैक्षणिक वर्ष २०२६-२७ मध्ये उच्च शिक्षण व्यवस्थेत गुणवत्ता, पारदर्शकता आणि शिस्तीला प्राधान्य देत विद्यार्थ्यांची उपस्थिती नोंदविण्यासाठी शासन निर्देशांनुसार सर्व महाविद्यालयांमध्ये 'बायोमेट्रिक' प्रणाली कार्यान्वित करणे बंधनकारक असल्याच्या सूचना पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठाने दिल्या आहेत.

विद्यापीठाच्या प्रवेश समितीची बैठक कुलगुरू डॉ. प्रकाश महानवर यांच्या अध्यक्षतेखाली पार पडली. यावेळी विद्यापीठाशी संलग्न सर्व महाविद्यालयांचे




प्राचार्य उपस्थित होते.

या बैठकीत शैक्षणिक वर्ष २०२६-२७ साठी विविध अभ्यासक्रमांच्या प्रवेश प्रक्रियेचा आढावा घेण्यात आला. विद्यापीठाच्या संकेतस्थळावरील ऑनलाइन पोर्टलद्वारे प्रवेश प्रक्रिया सुरू असून प्रत्येक पात्र विद्यार्थ्याला प्रवेश उपलब्ध करून देण्यासाठी नियोजनबद्ध कार्यवाही करण्याच्या सूचना देण्यात आल्या. शासनाच्या निर्देशांनुसार विद्यार्थ्यांची उपस्थिती अचूक व पारदर्शक पद्धतीने नोंदविण्यासाठी सर्व महाविद्यालयांनी तातडीने बायोमेट्रिक मशीन कार्यान्वित करून त्याचा नियमित वापर सुरू करावा, अशा सूचना देण्यात आल्या. विद्यार्थ्यांच्या उपस्थितीची संपूर्ण नोंद व रेकॉर्ड महाविद्यालयांनी जतन करून ठेवावे. 'बायोमेट्रिक' प्रणालीमुळे विद्यार्थ्यांच्या उपस्थितीची अचूक माहिती उपलब्ध होणार असून शैक्षणिक प्रक्रियेत अधिक शिस्त निर्माण होईल, असा विश्वास यावेळी व्यक्त करण्यात आला.

शैक्षणिक वर्ष २०२६-२७ मध्ये विद्यार्थ्यांच्या प्रवेशासाठी व्यापक नियोजन करण्याबरोबरच गुणवत्तापूर्ण शिक्षणासाठी आवश्यक पायाभूत सुविधा सक्षम करण्यावर भर देण्यात आला. शासनाच्या निर्देशानुसार सर्व वर्गखोल्या तसेच प्रयोगशाळांमध्ये सीसीटीव्ही यंत्रणा कार्यान्वित करण्याच्या सूचना देण्यात आल्या. विद्यार्थ्यांच्या सुरक्षेसह शैक्षणिक प्रक्रियेतील पारदर्शकता वाढविण्यासाठी ही व्यवस्था उपयुक्त ठरणार असल्याचे सांगण्यात आले. यावेळी कौशल्याधारित शिक्षणाला चालना देण्यासाठी 'एईडीपी' अंतर्गत महाविद्यालयांनी आपल्या परिसरातील उद्योग, व्यवसाय व रोजगाराच्या संधी लक्षात घेऊन योग्य विषयांची निवड करावी. तसेच त्यासंदर्भातील अभ्यासक्रम सुरू करण्यासाठी (पान 2 वर..)


## सोलापूर जिल्ह्यात चघळतात रोज कोटींचा मावा; विक्रेत्यांना मुंढेंची धास्ती

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** राज्यात गुटखा आणि मावा विक्रीवर बंदी असतानाही सोलापूर जिल्ह्यातील मावा विक्रीचा व्यवसाय अद्यापही तेजीत आहे. जिल्ह्यातील अंदाजे १५ हजार पानटपऱ्यांमधून दररोज एक कोटी रुपयांहून अधिक उलाढाल होत असल्याचा अंदाज व्यक्त केला जात आहे.

अन्न व औषध प्रशासनाचे नऊ अन्न सुरक्षा अधिकारी कारवाईसाठी मैदानात उतरले असून, आयुक्त तुकाराम मुंढे यांच्या नियुक्तीनंतर धाडींचे प्रमाण वाढले आहे. मात्र, शहरासह जिल्ह्यात अनेक ठिकाणी मावा-गुटख्याची विक्री अद्याप सुरूच असल्याचे चित्र आहे.

महाराष्ट्रात १९ जुलै २०१२ पासून गुटखा बंदी लागू आहे. मात्र, कर्नाटकमधून तुकडा सुपारी, सुगंधित तंबाखू आणि अन्य साहित्य आणून मावा तयार केला जात असल्याचे यापूर्वीच्या कारवायांमधून समोर आले आहे. गुटखा बंदीनंतर अनेक पानटपरी चालकांनी 'मावा' या पर्यायाचा आधार घेतला. कालांतराने माव्याचे व्यसन वाढत गेले आणि त्याची मागणीही वाढली. परिणामी, १० रुपयांना मिळणाऱ्या माव्याची किंमत आता १५ ते २० रुपयांपर्यंत पोहोचली आहे.

जिल्ह्यातील अनेक पानटपऱ्या शाळा-महाविद्यालयांच्या परिसरात आहेत. त्यामुळे विद्यार्थ्यांपर्यंतही मावा सहज पोहोचत असल्याची चिंता व्यक्त होत आहे. यापूर्वी मावा विक्रेत्यांवर सातत्याने कारवाई होत नसल्याने या व्यवसायाचे जाळे



वाढत गेले. मात्र, अन्न व औषध प्रशासनाच्या आयुक्तपदी तुकाराम मुंढे यांची नियुक्ती झाल्यानंतर राज्यभर कारवाईची मोहीम तीव्र झाली आहे. त्याचा परिणाम सोलापूर जिल्ह्यातही दिसत असला, तरी मावा विक्रीला अद्याप पूर्णतः आळा बसलेला नाही.

१ एप्रिलपासून अन्न व औषध प्रशासनाने जिल्ह्यात २८ धाडी टाकल्या आहेत. या कारवाईत २२ गोदामे आणि सात वाहने जप्त करण्यात आली असून, सुमारे ३५ लाख रुपयांचा मुद्देमाल हस्तगत करण्यात आला आहे. त्यामुळे मावा विक्रेत्यांमध्ये धास्ती निर्माण झाली असली, तरी काही भागांत अद्याप अडोशाला मावा आणि गुटखा विक्री सुरू असल्याचे दिसून येते.

**कारवाईत वारंवार समोर येणारे भाग**

मौलाली चौक, नई जिंदगी, मजरेवाडी, रेल्वे स्टेशन रोड, सात रस्ता परिसर, गुरुनानक चौक, आसरा चौक, विजयपूर रोड, बेगम पेठ पोलिस चौकी परिसर आणि दत्त चौक या भागांत यापूर्वीच्या कारवायांमध्ये मावा विक्रीची प्रकरणे समोर आली आहेत. याशिवाय तालुक्यांच्या ठिकाणी एसटी स्थानक परिसर, टोलनाका परिसर आणि वर्दळीच्या चौकांमध्येही मावा विक्री होत असल्याचे आढळून आले आहे.

**तर १० वर्षांपर्यंत कारावास**

भारतीय न्याय संहितेच्या कलम १२३ नुसार, कोणालाही फसवून, जबरदस्तीने किंवा अपायकारक पदार्थ देऊन त्याच्या आरोग्यास धोका निर्माण करणे हा गंभीर व अजामीनपात्र गुन्हा आहे. या गुन्ह्यात दोषी आढळल्यास १० वर्षांपर्यंत कारावास आणि दंडाची शिक्षा होऊ शकते. प्रतिबंधित व आरोग्यास घातक पदार्थांच्या विक्रीविरोधातील कारवाई अधिक कडक करण्याच्या दृष्टीने या तरतुदीकडेही प्रशासनाचे लक्ष आहे.

## सरकारी दवाखान्यांतील डॉक्टरांच्या अनुपस्थितीमुळे रुग्णांचे हाल; नागरिकांनी तक्रार करण्याचे आवाहन

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):** राज्यभरातील अनेक सरकारी रुग्णालये आणि प्राथमिक आरोग्य केंद्रांमध्ये डॉक्टरांच्या अनुपस्थितीचा प्रश्न दिवसेंदिवस गंभीर होत चालला आहे. डॉक्टर वेळेवर हजर नसणे, नियोजित वेळेत ओपीडी न सुरू होणे किंवा आवश्यक वैद्यकीय अधिकारी उपलब्ध नसणे याचा थेट फटका सर्वसामान्य रुग्णांना बसत आहे. विशेषतः ग्रामीण आणि आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांतील नागरिकांना यामुळे मोठ्या अडचणींना सामोरे जावे लागत आहे.

आरोग्य सेवा ही प्रत्येक नागरिकाचा मूलभूत हक्क मानली जाते. मात्र प्रत्यक्षात अनेक ठिकाणी रुग्णांना तासन्तास डॉक्टरांची वाट पाहावी लागते. परिणामी उपचारांना विलंब होतो, काही रुग्णांची प्रकृती अधिक गंभीर बनते, तर काही वेळा जीवितालाही धोका निर्माण होतो. सरकारी रुग्णालयांवर अवलंबून असलेल्या हजारो नागरिकांसाठी ही परिस्थिती चिंताजनक असल्याचे मत व्यक्त केले जात आहे.

सामाजिक कार्यकर्ते आणि माहिती अधिकार कार्यकर्ते विजय कुंभार यांनी या विषयाकडे लक्ष वेधताना नागरिकांना केवळ नाराजी व्यक्त करून थांबू नये, असे आवाहन केले आहे. डॉक्टर किंवा संबंधित वैद्यकीय कर्मचारी अनुपस्थित असल्याचे आढळल्यास त्याचे छायाचित्र, व्हिडिओ किंवा इतर पुरावे गोळा करून संबंधित वरिष्ठ अधिकारी, जिल्हा शल्यचिकित्सक, जिल्हा आरोग्य अधिकारी किंवा आरोग्य विभागाकडे अधिकृत तक्रार करावी, असे त्यांनी म्हटले आहे.

त्यांच्या मते, सरकारी सेवा ही कोणाच्याही उपकाराची बाब नसून ती नागरिकांना करातून मिळणारी हक्काची सेवा आहे. त्यामुळे सेवा वेळेवर मिळत नसेल, तर नागरिकांनी प्रश्न विचारणे आणि जबाबदारी निश्चित (पान 2 वर..)

## संपादकीय

# चिंतेच्या ढगांची दाटी

गेली काही वर्षे 'नेमेचि' उशीर करणाऱ्या मान्सूनने यंदाही आगमनाचा मुहूर्त चुकवला आहे. तळकोकणात दाखल झाल्यानंतर अजूनही बरसायला सुरुवात न झाल्याने महाराष्ट्रासह देशाच्या मोठ्या भागांमध्ये चिंतेचे ढग दाटून आले आहेत. अनेक भागांत धरणांमधील पाणीसाठे तळाला गेले असून, विविध शहरांमध्ये पाणीकपातीची वेळ आली आहे.

येत्या १५ जूनपर्यंत मान्सूनला प्रारंभ होण्याची शक्यता कमी आहे; त्यामुळे काही भागांमध्ये पडलेल्या मान्सूनपूर्व सरी आणि किरकोळ पावसावर अवलंबून राहून आत्ताच पेरणी करू नका, असे आवाहन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केल्याने अनिश्चितता कायम आहे. त्यातच 'एल निनो' घटक कार्यरत झाल्याने सरासरीपेक्षा मान्सून कमी होण्याचा अंदाज यापूर्वीच हवामानशास्त्र विभागाने वर्तवला आहे; 'एल निनो' अधिक सक्रिय झाला, तर गेल्या दशकभरातील सर्वांत कमी पाऊस होण्याची शक्यता आहे. गेल्या वर्षीच्या अतिवृष्टीच्या पार्श्वभूमीवर दुष्काळाचे संकट घोंघावत असल्याने संभाव्य संकटाला तोंड देण्यासाठी गांभीर्याने पावले उचलण्याची वेळ आली आहे.


एल निनोचा परिणाम आणखी वाढल्यास मान्सूनचे प्रमाण आणखी घटू शकते. यंदा केरळमध्येही मान्सूनचे आगमन विलंबानेच झाले. सध्या मान्सून तळकोकणात दाखल झाला असला, तरी त्याची पुढील वाटचाल मंदावण्याची शक्यता असून, १५ जूनपर्यंत मान्सूनच्या प्रगतीचा वेग कमी होणार आहे. परिणामी, विदर्भ, मराठवाडा, खानदेश आणि मध्य महाराष्ट्रात कमीअधिक पाऊस झाला, तरी हे वातावरण पेरणीसाठी पोषक नाही. या पावसावर भरवसा ठेवून शेतकऱ्यांनी पेरणी केल्यास नुकसानाची शक्यता नाकारता येत नाही, या कृषी विभागाने दिलेल्या इशाऱ्यात नक्कीच तथ्य आहे. गेल्या दशक-दोन दशकांमध्ये मान्सूनचे वेळापत्रक अनियमित झाले आहे.

अनेकदा पावसाळ्याचे चार महिने उलटून गेल्यानंतर डिसेंबर-जानेवारीतही पाऊस कोसळतो, असे अनुभव आहेत. कमी वेळात प्रचंड पाऊस पडण्याचे प्रमाण वाढल्याने त्याच्या असमान वितरणामुळे फटके बसत आहेत. पावसाचे अंदाज देण्याची पद्धत पूर्वीपेक्षा विकसित झाली आहे. मात्र, मान्सूनच्या वाटचालीत अनेक घटक कारणीभूत असल्याने त्यामध्ये अधिक अचूकपणा येण्यासाठी सुधारणांना वाव आहे. दमदार पाऊस होऊन मान्सून स्थिर होईपर्यंत धरणांमधील पाणीसाठ्याचे व्यवस्थापन, हा आणखी एक काळजीचा विषय होऊन बसला आहे. राज्यातील जलाशयांमध्ये सरासरी ४० टक्के साठा असला, तरी पुण्यासारख्या भागांत तो केवळ दहा टक्के आहे; विशेष म्हणजे यंदा कोयना धरणातील साठ्यानेही तळ गाठला आहे. वीजनिर्मितीसह पिण्यासाठी पाणी राखून ठेवणे जिकिरीचे बनले आहे. पुण्यासारख्या काही शहरांवर पाणीकपातीचे सावट आहे. मात्र, जूनच्या पहिल्या आठवड्यातच पाणीकपातीची वेळ येते, याचा अर्थ जलसाठ्याचे नियोजन चुकले का, याचे उत्तर जलसंपदा विभागाला द्यावे लागेल.

संभाव्य दुष्काळी स्थितीमुळे शेती उत्पादनावर परिणाम होण्याची भीती आहे. विशेषतः खरिपातील भात, डाळी आणि तृणधान्यांसह सोयाबीनच्या लागवडीलाही फटका बसण्याचा संभव आहे. अतिवृष्टी आणि सुपीक जमीन खरवडून गेल्याने गेल्या दोन हंगामांमध्ये शेतकऱ्यांना फटका बसला होता; त्या पार्श्वभूमीवर यंदा सलग तिसरा हंगाम अडचणीचा ठरू शकतो. त्यातच इराण युद्धस्थिती आणि होर्मुझच्या सामुद्रधुनीतील वाहतूक बंद झाल्याने समस्यांमध्ये भरच पडते आहे. पेट्रोल-डिझेल आणि गॅसटंचाई व महागाईचे चटके आताच बसत आहेत; तर आंबा, द्राक्षे, केळी आणि भाजीपाल्याच्या निर्यातदारांनाही युद्धाचा मोठा फटका बसला. सोबतच आखातामधून युरिया आणि 'डीएपी'ची वाहतूक अडल्याने खतांची टंचाई व दरवाढ झाली आहे.

बियाणे, कीटकनाशके आणि मजुरीचे दरही गगनाला भिडले आहेत. अशा काळात शेतकऱ्यांना दिलासा देण्यासाठी राज्य सरकारने दोन लाखांपर्यंत कर्जमाफी जाहीर केली; मात्र त्याची अंमलबजावणी होऊन शेतकऱ्यांना थकबाकीमुक्त होऊन नव्या कर्जास पात्र ठरण्यासाठी आणखी दोन महिने लागणार आहेत. या कामकाजाला सरकारने गती दिली पाहिजे. हवामान बदल आणि अनियमित पावसाच्या स्थितीला तोंड देण्यासाठी सरकारने कृती आराखडा केला असला, तरी त्याची अंमलबजावणी बव्हंशी कागदावरच आहे. सर्व घटकांना विश्वासात घेऊन काळाला अनुरूप धोरणे आखणे आणि नेटाने त्यांचे पालन करणे, हेच सरकारपुढील आव्हान आहे.

# साने गुरुजी



आज भारत मातेचे थोर सुपुत्र, स्वातंत्र्य सैनिक, समाजवादी विचारवंत, सामाजिक कार्यकर्ते, मराठी साहित्यिक साने गुरुजी यांची पुण्यतिथी. साने गुरुजी यांचे पूर्ण नाव पांडुरंग सदाशिव साने. त्यांचा जन्म २४ डिसेंबर १८९९ रोजी कोकणातील पालगड येथे झाला. त्यांचे वडील सदाशिवराव हे पालगडचे खोत होते. लहानपणापासून साने गुरुजींचे त्यांच्या आईवर खूप प्रेम होते. त्यांच्यावर त्यांच्या आईच्या शिकवणुकीचा खूप प्रभाव होता. श्यामची आई या पुस्तकात त्यांनी आपल्या आईच्या साऱ्या आठवणी सांगितल्या आहेत. साने गुरुजींच्या आईने त्यांच्या बालमनावर जे संस्कार केले त्यातूनच त्यांचा जीवनविकास झाला. सर्वांवरती प्रेम करा हा धडा त्यांना त्यांच्या आईनेच दिला. साने गुरुजींचे मन अतिशय भावनाप्रधान व संस्कारक्षम होते. म्हणूनच आईने पेरलेल्या सदभावनांची वाढ त्यांच्या ठिकाणी लवकर झाली. शिक्षण पूर्ण झाल्यावर त्यांनी अमळनेर येथील प्रताप हायस्कूलमध्ये काहीकाळ शिक्षक म्हणून नोकरी केली. प्रताप हायस्कूलच्या वसतिगृहाची जबाबदारी सांभाळताना त्यांच्यातील शिक्षकाला अधिक वाव मिळाला. त्यांनी वसतिगृहातील विद्यार्थ्यांना स्वाबलंबनाचे धडे दिले. सेवावृत्ती शिकवली. १९२८ साली त्यांनी विद्यार्थी हे मासिक सुरू केले. त्यानंतर त्यांनी विपुल लेखन केले. कांदबऱ्या, लेख, निबंध, काव्य, चरित्रे, नाट्यसंवाद अशा सर्व साहित्य प्रकारात त्यांची लेखणी अविरत चालली. त्यांच्या साहित्यात करुणा, स्नेह, प्रेम या गोष्टीचा वर्षाव झालेला आहे. त्यांच्या भाषेला एकप्रकारची धार आहे, बोध आहे. त्यांनी अतिशय साध्या आणि सोप्या शब्दात लेखन केल्याने लोकांना ते भावले. नाशिकच्या कारागृहात असताना त्यांनी श्यामची आई ही अजरामर कादंबरी लिहिली. धुळ्याच्या तुरुंगात त्यांनी विनोबा भावेंनी सांगितलेली गीताई लिहिली. साने गुरुजी थोर देशभक्त होते त्यांच्यावर महात्मा गांधींचा मोठा प्रभाव होता. ते स्वतः खादीचाच वापर करत. १९३० साली त्यांनी सविनय कायदेभंग आंदोलनात भाग घेतला त्यामुळे त्यांना तुरुंगवास भोगावा लागला होता. काँग्रेस नावाचे साप्ताहिक त्यांनी सुरू केले, दुष्काळात शेतकऱ्यांची करमाफी मिळावी यासाठीही त्यांनी आंदोलन केले होते. १९४२ च्या भारत छोडो आंदोलनात त्यांनी भाग घेतला. भूमिगत राहून स्वातंत्र्याचा प्रचार, राष्ट्र सेवा दलाचे कार्य या माध्यमातून त्यांनी राजकीय कार्य केले. पत्री या त्यांच्या पहिल्या काव्यसंग्रहात त्यांनी अनेक देशभक्तीपर गीते लिहिली. त्यातील बलसागर भारत होवो... या गीताने तरुणांना स्फुरण चढले या गीताने प्रेरित होऊन हजारो तरुण स्वातंत्र्य चळवळीत सहभागी झाले. या गीताचा वाढता प्रसार पाहून इंग्रज सरकारने या काव्यसंग्रहाच्या प्रती जप्त करुन या गीतावर बंदी आणली. साने गुरुजींना अस्पृश्यता, जातीपात, रूढी परंपरा, अंधश्रद्धा याविषयी कमालीची चीड होती. या गोष्टींना त्यांनी नेहमीच विरोध केला. पंढरपूरच्या विठ्ठल मंदिरात दलितांनाही प्रवेश मिळावा यासाठी १९४६ साली त्यांनी महाराष्ट्राभर दौरा केला. त्यासाठी त्यांनी उपोषण केले त्यांच्या प्रयत्नांमुळेच पंढरपूरच्या विठ्ठलाचे मंदिर सर्वांसाठी खुले झाले. एका पांडुरंगाने दुसऱ्या पांडुरंगाला मुक्त केले असे त्यावेळी म्हटले गेले. स्वातंत्र्य मिळाल्यावर ते समाजवादी पक्षात सामील झाले. स्वातंत्र्यानंतर आंतरभारती चळवळीच्या माध्यमातून त्यांनी देश जोडण्याचा प्रयत्न केला. विविध राज्यातील लोकांनी एकमेकांची संस्कृती समजून घ्यावी, अनेक भाषा समजून घ्याव्यात असा उद्देश या चळवळीचा होता. त्यांनी स्वतः तामिळ व बंगाली या भाषा शिकल्या होत्या. १९४८ साली त्यांनी साधना हे मासिक सुरू केले. या मासिकांतून ते जनजागृती करू लागले. ११ जून १९५० रोजी त्यांचे दुःखद निधन झाले. साने गुरुजींना पुण्यतिथी निमित्त विनम्र अभिवादन.



श्याम ठाणेदार
दौंड जिल्हा पुणे
९९२२५४६२९५

# 'प्रधानमंत्री राष्ट्रीय बाल पुरस्कार २०२६' साठी नामांकनांना सुरुवात

## अर्ज सादर करण्याची अंतिम मुदत ३१ जुलै

**नवी दिल्ली (कटू वृत्तसेवा):-** प्रधानमंत्री राष्ट्रीय बाल पुरस्कार 2026 साठी ऑनलाईन नामांकन प्रक्रिया सुरू झाली असून अर्ज सादर करण्याची अंतिम तारीख 31 जुलै 2026 निश्चित करण्यात आली आहे. इच्छुक उमेदवारांनी आपले अर्ज https://awards.gov.in या संकेतस्थळावर सादर करण्याचे आवाहन महिला आणि बाल विकास मंत्रालयाने केले आहे.

भारतात वास्तव्यास असलेले भारतीय नागरिक आणि 31 जुलै 2026 रोजी 5 ते 18 वर्षे वयोगटातील बालके या पुरस्कारासाठी पात्र आहेत. या पुरस्कारासाठी स्व-नामांकन तसेच तृतीय पक्षाकडून शिफारस अशा दोन्ही प्रकारच्या अर्जांना मान्यता दिली जाणार आहे.

अर्ज करताना उमेदवारांनी वैयक्तिक माहिती, पुरस्काराचा प्रवर्ग, अलीकडील छायाचित्र आणि आवश्यक कागदपत्रे अपलोड करणे आवश्यक आहे. तसेच आपल्या उल्लेखनीय कामगिरीची आणि तिच्या समाजावरील प्रभावाची माहिती 1,000 शब्दांपर्यंत सादर करावी लागणार आहे.

प्रधानमंत्री राष्ट्रीय बाल पुरस्कारांतर्गत शौर्य, क्रीडा, समाजसेवा, विज्ञान व तंत्रज्ञान, पर्यावरण तसेच कला व संस्कृती या सहा क्षेत्रांमध्ये असाधारण कामगिरी करणाऱ्या बालकांचा गौरव करण्यात येतो. शौर्य प्रवर्गात स्वतःच्या जीवाची पर्वा न करता इतरांचे प्राण वाचविण्यासाठी धैर्य दाखवणाऱ्या मुलांचा सन्मान केला जातो. क्रीडा प्रवर्गात राष्ट्रीय किंवा आंतरराष्ट्रीय स्तरावरील स्पर्धांमध्ये उल्लेखनीय यश संपादन करणाऱ्या मुलांना गौरविण्यात येते. समाजसेवा प्रवर्गात समाजकल्याण, पर्यावरण संवर्धन, गरजूंना मदत आणि राष्ट्रीय कार्यांमध्ये सक्रिय योगदान देणाऱ्या मुलांचा सन्मान केला जातो. विज्ञान व तंत्रज्ञान प्रवर्गात संशोधन, नवोपक्रम किंवा वैज्ञानिक नमुने विकसित करणाऱ्या मुलांना पुरस्कार दिला जातो. पर्यावरण प्रवर्गात शाश्वत विकास, जनजागृती मोहीम किंवा पर्यावरणपूरक नवकल्पनांमध्ये विशेष योगदान देणाऱ्या मुलांची निवड केली जाते. तर कला व संस्कृती प्रवर्गात संगीत, नृत्य, लेखन, चित्रकला, अभिनय किंवा इतर कलाक्षेत्रांमध्ये उल्लेखनीय प्राविण्य मिळवलेल्या मुलांचा गौरव केला जातो.

पान १ वरून

## सर्व महाविद्यालयांत विद्यार्थ्यांसाठी...

विद्यापीठाकडे प्रस्ताव पाठवावेत, अशा सूचना देण्यात आल्या. या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांना शिक्षणाबरोबरच प्रत्यक्ष कामाचा अनुभव मिळून ते अधिक कौशल्यसंपन्न व रोजगारक्षम बनतील, असा विश्वास व्यक्त करण्यात आला.

**परीक्षा प्रक्रियेत सीसीटीव्ही यंत्रणा**

कुलगुरू डॉ. प्रकाश महानवर यांच्या मार्गदर्शनाखाली परीक्षा विभागाकडून सूक्ष्म नियोजन करण्यात येत आहे. सर्व महाविद्यालयांच्या परीक्षा केंद्रांवरील वर्गखोल्यांमध्ये 'सीसीटीव्ही' यंत्रणा कार्यान्वित करण्याकरिता तसेच संबंधित 'सीसीटीव्ही'चे 'आयपी अ‍ॅड्रेस' विद्यापीठाच्या परीक्षा व मूल्यमापन मंडळाकडे पाठविण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. यामुळे विद्यापीठ प्रशासनाला सर्व परीक्षा केंद्रांवरील परिस्थितीचे थेट निरीक्षण करता येणार आहे. 'सीसीटीव्ही'मुळे कॉपीसारख्या गैरप्रकारांना आळा बसण्याबरोबरच परीक्षा प्रक्रियेत पारदर्शकता वाढून गुणवत्तावृद्धीस मदत होईल, असे संचालक परीक्षा व मूल्यमापन मंडळ डॉ. श्रीकांत अंधारे यांनी सांगितले.

## सरकारी दवाखान्यांतील डॉक्टरांच्या...

करण्याची मागणी करणे आवश्यक आहे.

आरोग्य विभागाकडून डॉक्टरांच्या उपस्थितीबाबत विविध नियम आणि मार्गदर्शक सूचना असल्या तरी अनेक ठिकाणी त्यांची प्रभावी अंमलबजावणी होत नसल्याच्या तक्रारी सातत्याने समोर येत आहेत. काही ठिकाणी डॉक्टरांच्या कमतरतेचे कारण पुढे केले जाते, तर काही ठिकाणी उपलब्ध मनुष्यबळ असूनही शिस्तीचा अभाव दिसून येतो. त्यामुळे रुग्णांच्या हक्कांचे संरक्षण करण्यासाठी प्रशासनाने अधिक कडक भूमिका घेण्याची गरज व्यक्त होत आहे.

नागरिकांनी जागरूक राहून आपल्या परिसरातील सरकारी आरोग्य संस्थांमधील गैरव्यवहार, अनुपस्थिती किंवा निष्काळजीपणाच्या घटना संबंधित यंत्रणेकडे पोहोचविल्यास आरोग्य व्यवस्थेतील पारदर्शकता आणि उत्तरदायित्व वाढण्यास मदत होऊ शकते. सार्वजनिक आरोग्य व्यवस्थेवर नागरिकांचा विश्वास टिकवून ठेवण्यासाठी जबाबदार अधिकारी आणि कर्मचाऱ्यांवर वेळेवर कारवाई होणेही तितकेच आवश्यक आहे.

सरकारी दवाखान्यांमधील सेवा दर्जेदार, वेळेवर आणि सर्वांसाठी उपलब्ध व्हावी, यासाठी नागरिकांची जागरूकता आणि प्रशासनाची उत्तरदायित्वाची भावना या दोन्ही गोष्टी तितक्याच महत्त्वाच्या असल्याचे मत आरोग्य क्षेत्रातील जाणकारांकडून व्यक्त केले जात आहे.

# सोलापूर येथून माझी बदली झाली, परंतु सोलापूर हे माझ्या मनात कायमस्वरूपी राहील - नागपूर जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** सोलापूर येथे 22 जुलै 2023 ते 3 एप्रिल 2026 या कालावधीत जिल्हाधिकारी म्हणून काम केले. जवळपास या तीन वर्षाच्या कालावधीत सोलापूर जिल्ह्यातील विविध प्रश्न, कामे हाताळण्यात आली. येथील नागरिक, लोकप्रतिनिधी तसेच सर्व प्रशासकीय अधिकारी कर्मचारी यांच्या सहकार्यातून हाती घेतलेली जवळपास सर्व कामे पूर्ण करण्यात आलेली आहेत. या कालावधीत सोलापूर जिल्ह्यातील नागरिकांनी जे प्रेम व सहकार्य केले त्याबद्दल त्यांचे खूप आभारी आहे. तसेच 3 एप्रिल 2026 रोजी माझी बदली नागपूर येथे झाली असली तरी सोलापूर जिल्हा कायमस्वरूपी माझ्या मनात आहे व राहील, असे भावनिक उद्गार तत्कालीन जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांनी त्यांच्या निरोप समारंभाच्या प्रसंगी काढले.



जिल्हा प्रशासनाच्या वतीने तत्कालीन जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांची नागपूर येथे बदली झाल्या निमित्त निरोप समारंभ कार्यक्रम नियोजन भवन येथील सभागृहात त आयोजित करण्यात आलेला होता, त्याप्रसंगी ते बोलत होते. यावेळी जिल्हाधिकारी एस. कार्तिकेयन, मुख्य कार्यकारी अधिकारी कुशल जैन, अप्पर जिल्हाधिकारी गणेश निऱ्हाळी, निवासी उपजिल्हाधिकारी अभिजीत पाटील, उपजिल्हाधिकारी सर्वश्री संतोषकुमार देशमुख, सुशांत बनसोडे, सुमित शिंदे, सदाशिव पडदुने, विजया पांगारकर, जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी शुक्राचार्य भोसले, जिल्हा नियोजन अधिकारी दिलीप पवार, अन्य धान्य वितरण अधिकारी ओंकार पडोळे यांच्यासह महसूल विभागाचे सर्व अधिकार कर्मचारी तसेच प्रशासनातील अन्य विभागाचे अधिकारी उपस्थित होते.

जिल्हाधिकारी आशीर्वाद पुढे म्हणाले की, जिल्हाधिकारी पदाची यशस्वी कारकीर्द ही येथील अधिकारी कर्मचाऱ्यांच्या कामावर अवलंबून असते. नव्याने रुजू झाल्यानंतर पहिल्या दोन-तीन महिन्यातच कोणत्या अधिकाऱ्याकडून कोणत्या प्रकारची

कामे करून घेता येतील याची माहिती होणे गरजेचे असते. तसेच वेळप्रसंगी अधिकारी कर्मचाऱ्यांच्या गरजेप्रमाणे त्यांना रजाही देणे आवश्यक असते. परंतु जिल्हाधिकारी यांनी कठोर असणे आवश्यक आहे. कारण जिल्हाधिकारी कठोर राहिले तर प्रशासनातील सर्व अधिकारी कर्मचारी अधिक गतीने कामे करतात व त्याचा लाभ सर्वसामान्य जनतेला लवकर मिळण्यात होऊन शासन व प्रशासनाची चांगली प्रतिमा तयार होण्यास मदत होते, असेही त्यांनी सांगितले.

महसूल प्रशासनाबरोबरच इतर विभागाच्या अधिकारी कर्मचारी यांनी केलेल्या उत्कृष्ट सहकार्यामुळेच आपण सोलापूर जिल्ह्यातील विविध प्रश्न, कामे मार्गी लावण्यात यशस्वी झालो असे जिल्हाधिकारी आशीर्वाद यांनी सांगून पंढरपूर कॉरिडॉर, सोलापूर येथील विमान सेवा सुरू करणे, आषाढी वारीचे यशस्वी आयोजन, पूर परिस्थितीत सर्व प्रशासकीय यंत्रणेने केलेले कामकाज तसेच प्रत्येक सोमवारी व शुक्रवारी जिल्ह्यातील सर्वसामान्य नागरिकांना भेटून त्यांच्या समस्या सोडवण्यासाठी केलेले प्रयत्न, यामुळे येथे आपण काहीतरी सर्वसामान्यांसाठी काम करू शकलो याचे समाधान वाटते, असे त्यांनी सांगितले. तसेच नागपूर येथे बदली झाली असली तरी सोलापूर जिल्ह्याच्या कोणत्याही प्रकारच्या कामासाठी आपण सांगितले तर ते काम करण्यासाठी तत्पर असल्याचेही त्यांनी यावेळी सूचित केले.

जिल्हाधिकारी एस कार्तिकेयान यावेळी म्हणाले की, मागील दोन महिन्यापासून जिल्हाधिकारी म्हणून आपण सोलापूर मध्ये काम करत असून तत्कालीन जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांनी येथे जी प्रशासकीय कामकाजाची चौकट निर्माण केली आहे, त्यामुळे कामे करताना कोणतीही अडचण येत नाही. येथील सर्व अधिकारी कर्मचारी दिलेली जबाबदारी काटेकोरपणे पार पडतात. तसेच श्री आशीर्वाद सरांनी जे आपले अनुभव मला सांगितलेले आहेत त्या पद्धतीने कामकाज करून सोलापूर जिल्हा विविध विकासकामात अग्रेसर ठेवण्यासाठी प्रयत्न करणार असल्याचे यावेळी त्यांनी सांगितले. यावेळी जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी की कुशल जैन यांनी तत्कालीन जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांच्या कामाचे व कार्यपद्धतीचे कौतुक केले.

सोलापूर जिल्ह्यातील प्रशासकीय कारभारात तीन वर्षे कुशल नेतृत्व व मार्गदर्शन देणारे जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांचा निरोप समारंभ सोमवारी सायंकाळी पार पडला. या प्रसंगी विविध विभागांचे अधिकारी, कर्मचारी संघटनांचे प्रतिनिधी यांनी मनोगत व्यक्त करून त्यांच्या कार्यकाळाचा आढावा घेतला. यामध्ये तहसीलदार मदन जाधव यांनी प्रशासकीय अनुभव शेअर करत जिल्हाधिकाऱ्यांच्या मार्गदर्शनामुळे कामकाज सुलभ झाल्याचे सांगितले.निवासी उपजिल्हाधिकारी अभिजीत पाटील यांनी प्रास्ताविक करून जिल्हाधिकाऱ्यांच्या कार्यपद्धतीचे कौतुक केले.उत्पादन शुल्क अधीक्षक भाग्यश्री जाधव यांनी मनोगत व्यक्त करत त्यांच्या निर्णयक्षमतेची प्रशंसा केली.जिल्हा पुरवठा अधिकारी संतोष सरडे यांनी जिल्हाधिकाऱ्यांच्या तीन वर्षांच्या कारकिदीर्चा आढावा घेतला. महत्वाच्या निर्णयांची माहिती देत त्यांनी कुशल नेतृत्व अधोरेखित केले.उपविभागीय अधिकारी विजया पांगारकर व उपजिल्हाधिकारी संतोषकुमार देशमुख यांनीही मनोगत व्यक्त करून जिल्हाधिकाऱ्यांच्या कार्यशैलीचे कौतुक केले. महसूल संघटनेचे पदाधिकारी शंतनू गायकवाड रविराज नसते यांनीही आपले मनोगत यावेळी व्यक्त केले. तसेच सर्व संघटनाचे पदाधिकारी व सर्व अधिकारी कर्मचारी यांनी जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांना पुष्पगुच्छ देऊन सत्कार केला.

सामाजिक व सांस्कृतिक उपक्रमांना दिलेले प्रोत्साहन. समारंभात उपस्थित अधिकारी व कर्मचारी यांनी जिल्हाधिकारी आशीर्वाद यांना भावपूर्ण निरोप देत त्यांच्या पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन उत्तर तहसील चे तहसीलदार निलेश पाटील यांनी केले तर आभार अपर जिल्हाधिकारी गणेश निऱ्हाळी यांनी मानले. या कार्यक्रमास जिल्ह्यातील महसूल विभागाचे सर्व अधिकारी कर्मचारी तसेच विविध शासकीय विभागाचे अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

# सर्व नोडल अधिकाऱ्यांनी दिलेली जबाबदारी अत्यंत काटेकोरपणे पार पाडावी : जिल्हाधिकारी एस. कार्तीकेयन

**सोलापूर, (कटूसत्य वृत्त):-** महाराष्ट्र विधान परिषद स्थानिक प्राधिकारी मतदारसंघ निवडणूक 2026 च्या अनुषंगाने नियुक्त करण्यात आलेल्या सर्व नोडल अधिकारी यांनी त्यांच्यावर सोपविण्यात आलेली जबाबदारी अत्यंत काटेकोरपणे पार पाडावी. व ही निवडणूक अत्यंत शांततामय वातावरणात व यशस्वीपणे पार पाडावी असे आवाहन जिल्हाधिकारी एस. कातीर्केयन यांनी केले.



जिल्हाधिकारी कार्यालयाच्या सभागृहात आयोजित विधान परिषद निवडणूक स्थानिक प्राधिकरण मतदार संघ बाबत नियुक्त सर्व नोडल अधिकारी यांच्या आढावा बैठकीत जिल्हाधिकारी कार्तिकेयन मार्गदर्शन करत होते. यावेळी निवडणूक निरीक्षक श्रवण हार्डीकर, अतिरिक्त पोलीस अधीक्षक विजय कबाडे, निवासी उपजिल्हाधिकारी अभिजीत पाटील, उप जिल्हा निवडणूक अधिकारी सुशांत बनसोडे, उप जिल्हाधिकारी संतोषकुमार देशमुख, प्रादेशिक परिवहन अधिकारी गजानन नेरपगार, समाज कल्याण सहायक आयुक्त सुलोचना सोनवणे, अन्य धान्य वितरण अधिकारी ओंकार पडोळे यांच्या सह अन्य नोडल अधिकारी उपस्थित होते.

जिल्हाधिकारी कातीर्केयन म्हणाले की, या निवडणुकीसाठी प्रत्येक उपविभागीय अधिकारी स्तरावर मतदान केंद्र असणार आहेत. या सहा ठिकाणचे वेब कास्टिंग करण्यात येऊन त्याचा नियंत्रण कक्ष जिल्हाधिकारी कार्यालयात करावा. मतदान व मतमोजणी साठी आवश्यक असलेले साहित्य तयार ठेवावे. एफएसटी, व्हीएसटी व एसएसटी या टीमची स्थापना करून त्या अत्यंत कार्यक्षमपणे काम करतील यासाठी नियोजन करावे. सूक्ष्म निरीक्षक यांची नियुक्ती करून त्यांना प्रशिक्षण द्यावे तसेच जिल्हाधिकारी कार्यालयात कॉल सेंटर तयार करून ते अ‍ॅक्टिव्ह पणे काम करेल हे पहावे. त्याप्रमाणेच निवडणूक कामकाजासाठी नियुक्त करण्यात आलेले अधिकारी व कर्मचारी यांचे प्रशिक्षण निवडणूक आयोगाच्या निदेर्शाप्रमाणे घ्यावे, अशा सूचना त्यांनी दिल्या.

पोलीस विभागाने ज्यांच्याकडे शस्त्रे आहेत त्या जमा करण्याची कारवाई तात्काळ पूर्ण करावी. निवडणुकीच्या अनुषंगाने चेक पोस्टवर तपासणी मोहीम अत्यंत बारकाईने राबवावी. मतमोजणी झाल्यानंतर मत पेट्या ठेवण्यासाठीची स्ट्रॉंग रूम तयार करावी. मतदान केंद्रावर आरोग्य पथके नियुक्त करावीत. तसेच सर्व संबंधित नोडल अधिकाऱ्यांनी त्यांच्यावर सोपवण्यात आलेले जबाबदारी परस्परात योग्य समन्वय ठेवून पार पाडावी अशा सूचना जिल्हाधिकारी कार्तिकेयन यांनी दिल्या.

**सर्व मतदारांना त्यांचे मतदान कोणत्या मतदान केंद्रावर आहे याची माहिती द्यावी - निवडणूक निरीक्षक श्रवण हार्डीकर**

महाराष्ट्र विधान परिषद सोलापूर स्थानिक मतदार संघ निवडणुकीसाठी एकूण 616 मतदार आहेत. तसेच 18 जून रोजी जिल्ह्यातील सहा मतदान केंद्रावर यासाठी मतदान प्रक्रिया पार पाडली जाणार आहे. तरी निवडणूक विभागाने सर्व मतदारांना त्यांचे मतदान कोणत्या मतदान केंद्रावर होणार आहे याची माहिती द्यावी. तसेच राजकीय पक्षाच्या प्रतिनिधींनाही मतदाराचे मतदान कोणत्या मतदार केंद्रावर आहे याविषयी कळवावे, एकूण मतदारांपैकी कोणी मयत आहेत का याचीही खात्री करावी, अशा सूचना निवडणूक निरीक्षक श्रवण हार्डीकर यांनी दिल्या.

श्री हार्डीकर पुढे म्हणाले की, पोलीस विभागांने मतदारांना कोणतेही प्रलोभन अथवा जबरदस्ती या अनुषंगाने तक्रारी आल्यास त्यावर तात्काळ कार्यवाही करावी, असे सांगितले. मतदान केंद्राची सुरक्षा, स्ट्रॉंग रूमची सुरक्षा व मतदान प्रक्रिया यशस्वीपणे पार पाडण्यासाठी आवश्यक तो बंदोबस्त पोलीस विभागाने ठेवावा. असे त्यांनी सूचित केले.

प्रारंभिक निवासी उप जिल्हाधिकारी अभिजीत पाटील यांनी विधान परिषद निवडणूक सोलापूर स्थानिक प्राधिकरण मतदारसंघासाठी 28 नोडल अधिकाऱ्यांची नियुक्ती करण्यात आल्याची माहिती देऊन प्रत्येकावर सोपवण्यात आलेल्या जबाबदारी विषयी त्यांनी माहिती दिली. तसेच यावेळी सर्व नोडल अधिकाऱ्यांनी आतापर्यंत केलेल्या कामकाजाची माहिती बैठकीत सांगितली.

## वात्रटिका

### छाप तुकारामांची

गाथा सांगून ठेवून गेले
ते संत होते तुकाराम...
भेसळ शोधून दणका देत
चालले हेही एक तुकाराम...
मी नाही तर करणार कोण
हा मंत्र आणि शिकवण ठेवा...
कौतुक आहेच पण इतरांनी
वागणुकीचा धडा घ्यावा...

**हणमंत पडवळ,**
धाराशिव,
8698067566

हे दैनिक मालक-प्रकाशक, मुद्रक, संपादकः श्री पांडूरंग हरिदास सुरवसे यांनी संस्कृती प्रिंटींग प्रेस, एफ-3, वृंदावन पार्क, होटगी रोड, सोलापूर - 413003 येथे छापून येथूनच प्रसिद्ध केले. कार्यालयः एफ - 3, वृंदावन पार्क, होटगी रोड, सोलापूर - 413003
फोन/फॅक्स +91 217 355 0592 RNI No . MAHMAR 2006/17624 संपादकः पांडूरंग हरिदास सुरवसे, मो. (9765390339) उपसंपादकः सचिन मोहन जाधव, मो. (9657069069) कायदा सल्लागारः अ‍ॅड खतीब वकील.
Owner, Publisher, Printer and Editor Pandurang Haridas Survase Printing at Sanskruti Printing Press F-3 Vrundavan Park, Hotagi Road, Solapur 413003. (Maharashtra) Published from Office F-3 Vrundavan Park, Hotagi Road, Solapur 413003.(Maharashtra) Phone- +91 217 355 0592 Editor Pandurang Survase-9765390339, Deputy Editor Sachin Jadhav-9657069069. **RNI No. MAHMAR 2006/17624**

# अकलूज पोलिसांनी लुटारुंच्या मुसक्या आवळल्या

## तीन वेगवेगळ्या गुन्ह्याचा लावला छडा




**अकलूज (कटूसत्य वृत्त):-** अकलूज पोलिसांनी एका इसमास मारहाण करून,लूट करणाऱ्या आरोपींच्या मुसक्या आवळल्या असून यासह इतर दोन गुन्ह्यांचाही छडा लावला.

अकलूज पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार फियार्दी रा. वायफळ ता. जत जि. सांगली हे, दिनांक ०३/०६/२०२६ रोजी अकलुज येथील हॉटेलमधुन जेवून करुन एस. टी. स्टँडकडे चालत जात असताना, दोन अनोळखी इसमांनी दुचाकीवरुन येवून फियार्दीस कोठे जायचे आहे असे विचारले, त्यावर फियार्दीने एस टी स्टँडकडे जात असल्याचे सांगितल्याने, सदर इसमांनी चला आमचे गाडीवर बसा तुम्हाला एस टी स्टँडवर सोडतो, असे म्हणून त्यांचे मोटार सायकलवर बसवून दुचाकी एस टी स्टँडकडे न नेहता तांबोळीवसाहत, गिरमेवस्ती येथील निर्जन ठिकाणी नेवून, फियार्दीस काठीने मारहाण करुन त्यांचे खिशातील ९९,३५०/- रुपये रोख रक्कम जबरी चोरी केली. यामुळे अकलुज पोलीस ठाणे गु. र.नं. ४०३/२०२६ बी.एन.एस.क. ३०९ (६), ३ (५) प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

सदर गुन्हयाचा तपास करीत असताना गुन्हे प्रकटीकरण पथकाने सीसीटीव्ही फुटेज, तांत्रीक माहिती व गोपनीय बातमीदार यांचे मदतीने, अनोळखी दोन इसमांचा शोध घेतला असता, सदरचा गुन्हा हा आरोपी नामे १) सुनिल भिमराव भिंगारदिवे रा. राऊतनगर, अकलुज, माळशिरस, २) आजिनाथ नागनाथ गिरी, ३) संतोष महादेव गायकवाड दोघे रा. सराटी ता. इंदापूर जि. पुणे यांना ताब्यात घेवून त्यांचेकडे चौकशी केली असता, त्यांनी गुन्हयाची कबुली दिली. त्यामध्ये आरोपी १) सुनिल भिमराव भिंगारदिवे रा. राऊतनगर, अकलुज, माळशिरस याचे सांगणेवरुन आरोपी २) आजिनाथ नागनाथ गिरी, ३) संतोष महादेव गायकवाड दोघे रा. सराटी ता. इंदापूर जि. पुणे यांनी सदरचा गुन्हा केल्याचे निष्पन्न झाले असून आरोपींकडून त्यांनी जबरी चोरीमध्ये चोरी केलेली ९९,३५०/- रुपये रोख रक्कम हस्तगत करण्यात आली आहे. तसेच गुन्हयात वापरले दुचाकी वाहन जप्त करण्यात आले आहे. सदर गुन्हयाचा तपास पोलीस उपनिरीक्षक विशाल कदम हे करीत आहेत.

तसेच अकलुज पोलीस ठाणे गु.र.नं. ३६३/२०२६ बी.एन.एस. क. ३०४ (२) प्रमाणे दाखल गुन्हयामध्ये अकलुज नवीन बस स्थानक येथुन टेंभुर्णीकडे जाणारे बसमध्ये प्रवाशी चढत असताना फियार्दीचे गळयातील १० ग्रॅम वजनाची सोन्याची चैन अज्ञात इसमाने चोरुन नेलेवरुन गुन्हा दाखल होता. त्यामध्ये अकलुज पोलीस ठाणे गुन्हे प्रकटीकरण पथकाने सीसीटीव्ही फुटेज, तांत्रीक माहिती व गोपनीय बातमीदार यांचे मदतीने अज्ञात इसमाचा शोध घेतला असता सदरचा गुन्हा हा आरोपी नामे १) सुधीर रावसाहेब कराळे रा. धामनगांव देवी ता. पाथर्डी, जि. अहिल्यानगर, २) शुभम गोरक्ष चव्हाण रा. इंदिरानगर, पाथर्डी, ता. पाथर्डी जि. अहिल्यानगर यांनी केल्याचे निष्पन्न झाल्याने सदर आरोपींचा शोध घेवून त्यांना अटक करुन त्यांचेकडून गुन्हयातील गेलेला माल फियार्दीचे गळयातील १० ग्रॅम वजनाची सोन्याची चैन,एकुण ९४,०००/- रुपयेची असा १०० टक्के हस्तगत करण्यात आला आहे. सदर गुन्हयाचा तपास पोलीस हवा. शिवकुमार मदभावी हे करीत आहेत.

तसेच अकलुज पोलीस ठाणे गु.र.नं. ३५४/२०२६ बी.एन.एस. क. ३०४, ३(५) प्रमाणे दाखल गुन्हयामध्ये फियार्दी रा. माळखांबी ता. माळशिरस या शेतातुन जनावरांसाठी चारा डोक्यावरुन घेवून जात असताना अनोळखी दोन इसमांनी त्यांचेजवळ येवून पत्ता विचारण्याचे बहान्याने फियार्दीचे गळयातील ६ ग्रॅम वजनाचे सोन्याचे मणी असलेला पत्ता हिसका देवून चोरुन नेलेवरुन गुन्हा दाखल होता. त्यामध्ये अकलुज पोलीस ठाणे गुन्हे प्रकटीकरण पथकाने सीसीटीव्ही फुटेज, तांत्रीक माहिती व गोपनीय बातमीदार यांचे मदतीने अनोळखी दोन इसमाचा शोध घेतला असता सदरचा गुन्हा हा आरोपी नामे १) बालाजी हणुमंत पवार रा. पवारवस्ती, खेडभोसे ता. पंढरपूर, २) पंडीत सुभाष होळकर रा. व्होळे ता. पंढरपूर यांनी केल्याचे निष्पन्न झाल्याने सदर आरोपींचा शोध घेवून त्यांना अटक करुन त्यांचेकडून गुन्हयातील गेला माल फियार्दीचे गळयातील ६ ग्रॅम वजनाचे सोन्याचे मणी असलेला पत्ता व गुन्हयात वापरलेली मोटार सायकल बजाज पल्सर असा १०० टक्के हस्तगत करण्यात आला आहे. सदर गुन्हयाचा तपास पोलीस हवा. राहुल रणनवरे हे करीत आहेत.

सदरची कामगिरी पोलीस अधीक्षक अतुल कुलकर्णी, अपर पोलीस अधीक्षक विजय कबाडे, उपविभागीय पोलीस अधिकारी, अकलुज विभाग अकलुज संतोष वाळके, पोलीस निरीक्षक निरज उबाळे यांचे मार्गदर्शनाखाली गुन्हे प्रकटीकरण शाखेचे पोलीस उपनिरीक्षक विशाल कदम, पो. हवा. शिवकुमार मदभावी, विक्रम घाटगे, विनोद साठे, सुहास क्षिरसागर, राहुल रणवरे, विशाल पोरे, पोलीस अंमलदार दत्तात्रय खरात, पंडीत गवळे, प्रविण काळे यांनी कामगिरी केली आहे. तसेच सायबर पोलीस ठाणेकडील प्रविण मेटकरी, राहुल सोनकर यांनी सहकार्य केले आहे.

# अन्नछत्र मंडळाचे कार्य सातासमुद्रापार

## गोव्यात दत्त मंदिर जीर्णोद्धारास सुरुवात



**अक्कलकोट (कटूसत्य वृत्त):-** अवधूत चिंतन श्री गुरुदेव दत्त...! सद्गुरू श्री स्वामी समर्थ महाराज की जय...! च्या जय घोषात उत्साहपूर्ण वातावरणात श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळाच्या गोवा येथील नानोरा बिचोलिम गट नं.४८७/६ या जागेत श्री दत्त मंदिर जीर्णोद्वार भूमिपूजन कार्यक्रम मंगळवारी मोठ्या उत्साहात संपन्न झाला.

श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळाचे संस्थापक अध्यक्ष जनमेजयराजे विजयसिंहराजे भोसले यांच्या मार्गदर्शनाखाली व कार्यकारी अध्यक्ष अमोलराजे जनमेजयराजे भोसले यांच्या नेतृत्वाखाली न्यासाचा विस्तार भक्ताभिमुख होत आहे. याचाच एक भाग म्हणून संस्थेने गोवा येथील नानोरा बिचोलिम गट नं.४८७/६ या जागेत श्री दत्त मंदिर जीर्णोद्वार भूमिपूजन कार्यक्रम शेकडो गोवेकर स्वामी भक्त यांच्या उपस्थितीत संपन्न झाला आहे. गोवा येथील पुरोहित प्रमोद केळकर, राजू केळकर यांच्या मंत्र पठण व पूजनाने श्री दत्त मंदिर जीर्णोद्वार भूमिपूजन संपन्न झाला.

दरम्यान श्री दत्त मंदिर जीर्णोद्वार भूमिपूजन बिचोलीमचे आमदार- डॉ. चंद्रकांत शेटे, श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळाचे संस्थापक अध्यक्ष- जनमेजयराजे विजयसिंहराजे भोसले यांच्या हस्ते व जि.प. सदस्य- प्रमोद मईके, पं. स. सदस्य- निलम खारापूर, माजी सरपंच- शाम अरमलकर, म्हापसा भाजपा अध्यक्ष- योगेश खेडेकर, उत्तर गोवा भाजपाचे- राजेसिंग राणे, अन्नछत्र मंडळाचे उपाध्यक्ष- अभय खोबरे, म्हापसा गोवाचे माजी महापौर रोहन कवळेकर, ॲड. रंजिता कवळेकर, मधुसूदन गुरव, कार्ल डिसोजा, गोविंद फडके, परीस ओगळे, ॲड. जीवन कलंघुटकर, मुंबईचे उद्योगपती- विजय तांडेल, मनोज गंगावणे, न्यासाचे वास्तुविशारद, अभियंता योगेश अहंकारी, आराध्य तांडेल, नाशिकचे उद्योगपती शुभम नागरे, सोलापूर उद्योगपती सिद्धाराम व्हलसुरे, प्रा. सायबण्णा जाधव, जानूभाऊ गावडे, शिवराज स्वामी, मैनुद्दीन कोरबू, सर्फराज शेख, महांतेश स्वामी, संतोष माने, मारुतीराव बोरकर, आकाश उदगिरी, मल्लिकार्जुन कोळी, गोकुळ पाटील यांच्या सह गोवा येथील स्वामी भक्त बहुसंख्येने उपस्थित होते.

गोवा येथे बहुसंख्येने श्री स्वामी समर्थांचे भक्त असून ते श्री स्वामी अन्नछत्र मंडळाशी जोडलेले आहेत. गोवा येथील नानोरा बिचोलिम येथील श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळाच्या जागेत श्री दत्त मंदिर होते. याचा जीर्णोद्वार व्हावा म्हणून तेथील स्वामीभक्तांची मागणी होती.

**अन्नछत्र मंडळाचे कार्य सातासमुद्र पार**

श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळाचे संस्थापक अध्यक्ष जनमेजयराजे विजयसिंहराजे भोसले यांच्या मार्गदर्शनाखाली व कार्यकारी अध्यक्ष अमोलराजे जनमेजयराजे भोसले यांच्या नेतृत्वाखाली न्यासाचा विस्तार भक्ताभिमुख होत आहे. याचाच एक भाग म्हणून संस्थेने गोवा येथील नानोरा बिचोलिम गट नं.४८७/६ या जागेत श्री दत्त मंदिर जीर्णोद्वार भूमिपूजन कार्यक्रम शेकडो गोवेकर स्वामी भक्त यांच्या उपस्थितीत संपन्न झाला आहे. आम्ही गोवेकरांनी न्यासाकडे केलेली मागणी संस्थापक अध्यक्ष जनमेजयराजे विजयसिंहराजे भोसले यांनी पूर्ण केलेली आहे. आम्हा गोवेकरांची अन्नछत्र मंडळ हे श्रद्धास्थळ आहे. त्यांचे धार्मिक क्षेत्राबरोबरच सामाजिक, शैक्षणिक, संस्कृतिक, क्रीडा क्षेत्रात उल्लेखनीय कार्य आहे. याचा आम्हाला सार्थ अभिमान आहे.

**डॉ. चंद्रकांत शेटे**
आमदार बिचोलीम- गोवा राज्य

# एनटीपीसी सोलापूरतर्फे जीईएम २०२६ चा भव्य समारोप सोहळा




**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** ९ जून २०२६ रोजी सायंकाळी, एनटीपीसी सोलापूर येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर सभागृहात 'बाल सक्षमीकरण अभियान - जीईएम २०२६' चा भव्य समारोप सोहळा पार पडला.

या गंभीर प्रसंगी, एनटीपीसीचे संचालक (वित्त) जयकुमार श्रीनिवासन आणि संयुक्त महिला समितीच्या ज्येष्ठ सदस्या श्रीमती सुनीता श्रीनिवासन हे प्रमुख पाहुणे होते. विशेष पाहुण्यांमध्ये प्रादेशिक कार्यकारी संचालक (पश्चिम विभाग-१) ई. सत्य फणी कुमार आणि सखी महिला समितीच्या अध्यक्षा श्रीमती ई. सरोजा यांचा समावेश होता.

या कार्यक्रमाला बी.जे.सी. उपस्थित होते. एनटीपीसी सोलापूरचे कार्यकारी संचालक आणि प्रकल्प प्रमुख, शास्त्री, यांच्यासोबत सर्व महाव्यवस्थापक, विभाग प्रमुख, सृजना महिला मंडळाच्या अध्यक्षा श्रीमती पद्मा शास्त्री, वरिष्ठ सदस्य आणि संघटना व संस्थांचे अधिकारी उपस्थित होते. मोठ्या संख्येने सहभागी मुली, त्यांचे पालक, स्किल एरा इन्स्टिट्यूटचे प्रतिनिधी, एनटीपीसीचे कर्मचारी आणि त्यांचे कुटुंबीय उपस्थित होते.

आपल्या भाषणात, संचालक (वित्त) जयकुमार श्रीनिवासन यांनी एनटीपीसी सोलापूरच्या प्रयत्नांची प्रशंसा केली आणि सांगितले की, 'जीईएम' कार्यक्रम देशात बदल घडवून आणण्यासाठी एक शक्तिशाली माध्यम बनला आहे आणि त्याला आंतरराष्ट्रीय स्तरावरही प्रतिसाद मिळत आहे. प्रादेशिक कार्यकारी संचालक ई. सत्य फणी कुमार यांनी याला समाजात मुलींची भूमिका सशक्त करण्याच्या दिशेने एक क्रांतिकारक उपक्रम असे वर्णन केले.

'जीईएम' मुलींनी सादर केलेल्या सांस्कृतिक कार्यक्रमातून भारताचा विविध सांस्कृतिक वारसा दिसून आला. नृत्य, नाटक आणि आत्मसंरक्षणाच्या प्रात्यक्षिकांसह सादर झालेल्या मनमोहक सादरीकरणाने प्रेक्षकांना मंत्रमुग्ध केले. मुलींनी आत्मविश्वासाने मंचावर आपली कला सादर केली, ज्यामुळे संपूर्ण कार्यक्रमादरम्यान उत्साह आणि आनंदाचे एक अनोखे वातावरण निर्माण झाले. संपूर्ण सभागृह टाळ्यांच्या कडकडाटाने दुमदुमले.

९ मे ते ९ जून २०२६ या कालावधीत आयोजित 'जीईएम २०२६' कार्यशाळेत, परिसरातील सरकारी शाळांमधील इयत्ता सहावीच्या ५० मुलींना शिक्षण, आरोग्य, व्यक्तिमत्व विकास आणि आत्मसंरक्षण यांसारख्या विषयांवर प्रशिक्षण देऊन त्यांना स्वावलंबन आणि आत्मविश्वासाने सक्षम करण्यात आले.

या नाविन्यपूर्ण सीएसआर उपक्रमांतर्गत, निवडलेल्या चार गुणवंत मुलींना एनटीपीसी टाऊनशिपमधील नोट्रे ॲश मेन येथे मोफत शिक्षण मिळेल.

नोंदणी रद्द केल्यानंतर, मुलींना त्यांच्या पालकांच्या स्वाधीन करण्यात आले. हा कार्यक्रम केवळ या मुलींच्या स्वप्नांना पंख देत नाही, तर संपूर्ण परिसराला अधिक सक्षम आणि जागरूक समाजाकडे नेत आहे.

# शेतकऱ्यांच्या लढ्याला जि.प सदस्य नेताजी खंडागळे यांचा पाठिंबा



**सोलापूर, (कटूसत्य वृत्त):-** गोकुळ शुगरकडून शेतकरी बांधवांचे थकीत असलेले सुमारे ३० कोटी रुपये मिळावेत, या मागणीसाठी सुरू असलेल्या आंदोलनाला जिल्हा परिषद सदस्य नेताजीभाऊ खंडागळे यांनी भेट देत पाठिंबा दर्शविला. यावेळी त्यांनी आंदोलनकर्त्या शेतकऱ्यांच्या समस्या जाणून घेत संबंधित प्रशासनाशी थेट संपर्क साधून प्रश्न मार्गी लावण्यासाठी प्रयत्न केले.

कित्येक दिवसांपासून आपल्या हक्काच्या पैशांसाठी शेतकरी बांधव रस्त्यावर उतरून आंदोलन करत आहेत. या पार्श्वभूमीवर नेताजीभाऊ खंडागळे यांनी आंदोलनस्थळी भेट देऊन शेतकऱ्यांशी संवाद साधला. तसेच त्यांनी आमदार सचिनदादा कल्याणशेट्टी आणि जिल्हाधिकाऱ्यांशी संपर्क साधून शेतकरी प्रतिनिधींना आपली भूमिका मांडण्याची संधी उपलब्ध करून दिली.

यावेळी आमदार सचिनदादा कल्याणशेट्टी यांनीही या प्रश्नात स्वतः लक्ष घालत जिल्हाधिकाऱ्यांसमवेत कॉन्फरन्स कॉलद्वारे शेतकऱ्यांशी संवाद साधला. शासनाचे शिष्टमंडळ लवकरच आंदोलनस्थळी भेट देणार असून या प्रकरणी लेखी आश्वासन दिले जाईल, असे त्यांनी स्पष्ट केले.

शेतकऱ्यांच्या कष्टाचा प्रत्येक रुपया त्यांना मिळालाच पाहिजे, अशी भूमिका मांडत नेताजीभाऊ खंडागळे यांनी शेतकरी बांधवांच्या न्याय्य हक्कासाठी हा लढा अखेरपर्यंत सुरू राहील, अशी ग्वाही दिली. त्यांच्या या पाठपुराव्यामुळे आंदोलनकर्त्या शेतकऱ्यांमध्ये आशेचे वातावरण निर्माण झाले आहे.

# निमगाव येथील सिनियर कॅशियर विलास सुरवसे यांची प्रशासकीय बदली



**निमगाव (कटूसत्य वृत्त):-** फळवणी (ता. माळशिरस) येथील सुपुत्र तथा महाराष्ट्र ग्रामीण बँक (पूर्वीची विदर्भ कोकण ग्रामीण बँक) निमगाव शाखा येथील सिनियर कॅशियर विलास सोपान सुरवसे यांची पंढरपूर तालुक्यातील पटवर्धन कुरोली येथे प्रशासकीय बदली झाली आहे. या निमित्ताने निमगाव शाखा आणि ग्रामस्थांच्या वतीने त्यांचा शाल, श्रीफळ देऊन सन्मान करून पुढील वाटचालीस शुभेच्छा देण्यात आल्या. विलास सुरवसे यांच्या बदलीमुळे मात्र निमगाव परिसरातील शेतकऱ्यांमधून आणि बँकेच्या खातेदारांमधून हळहळ व्यक्त केली जात आहे.

निमगाव (म) सारख्या राजकीय दृष्ट्या संवेदनशील आणि कृषिप्रधान गावामध्ये काम करताना विलास सुरवसे यांनी कधीही गट-तट पाहिले नाहीत. सर्वसामान्य शेतकऱ्यांच्या हिताला सर्वोच्च प्राधान्य देत त्यांनी आपले कामकाज चोख बजावले. शेतकऱ्यांशी सातत्याने जिव्हाळ्याचा संवाद साधत त्यांनी बँकेच्या माध्यमातून गावाच्या विकासाला मोठा हातभार लावला.सुरवसे यांनी आपल्या कार्यकाळात अत्यंत कौशल्याने काम केले. शेतकऱ्यांना वेळेवर आणि योग्य कर्जवाटप करणे, खातेदारांशी उत्तम संवाद ठेवून वेळोवेळी कर्ज वसुली करणे आणि बँकेची सुरक्षा ठेव (डिपॉझिट) वाढवण्यात त्यांनी मोलाची भूमिका बजावली. त्यांच्या याच अष्टपैलू कामगिरीमुळे एकेकाळी २५ कोटी रुपयांवर गेलेला निमगाव शाखेचा एन.पी.ए. (थकीत कर्ज) थेट ४ कोटी रुपयांपर्यंत खाली आणण्यात त्यांना मोठे यश आले. यामुळे बँकेची आर्थिक स्थिती मजबूत झाली.

विलास सुरवसे यांची बँकेतील नोकरीची सुरुवात 'शिपाई' पदापासून झाली होती. मात्र, आपल्या अंगी असलेली जिद्द आणि कष्टाच्या जोरावर त्यांनी बँकेच्या खात्यांतर्गत परीक्षा दिल्या. या परीक्षांमध्ये यश मिळवून त्यांनी आधी क्लार्क आणि त्यानंतर 'सिनियर कॅशियर' पदापर्यंत मजल मारली. त्यांचा हा प्रवास अनेक तरुणांसाठी प्रेरणादायी असाच आहे.

बँकेत प्रशासकीय काम करत असतानाच सुरवसे यांनी बँकेच्या कर्मचारी संघटनांमध्येही आपले नेतृत्व सिद्ध केले आहे. त्यांनी बँक कर्मचाऱ्यांची नामांकित संघटना अक्हएअ (ऑल इंडिया बँक एम्प्लॉईज असोसिएशन) च्या सोलापूर विभागाचे अध्यक्ष म्हणून सक्षमपणे जबाबदारी सांभाळली. यासोबतच एस.सी./एस.टी. वेलफेअर संघटनेचे सोलापूर रिजनचे 'रिजनल सेक्रेटरी' म्हणूनही त्यांनी काम पाहिले असून बँक कर्मचाऱ्यांचे प्रश्न सोडवण्यात ते नेहमीच अग्रेसर राहिले आहेत.

सर्वांशी मिळून-मिसळून राहण्याच्या त्यांच्या स्वभावामुळे निमगाव परिसरातील शेतकरी आणि खातेदारांशी त्यांचे एक कौटुंबिक व जिव्हाळ्याचे नाते तयार झाले होते. त्यांच्या बदलीमुळे बँकेचे आणि गावाचे मोठे नुकसान झाल्याची भावना निमगाव येथील ग्रामस्थांनी सत्कार समारंभाप्रसंगी बोलताना व्यक्त केली.

या सोबतच निमगाव शाखेचे कर्मचारी सुशील दहीटे यांचीही बदली झाल्याने यथोचित सन्मान करून पण निरोप देण्यात आला. याप्रसंगी निमगाव शाखेचे शाखाधिकारी गजानन जाधव, तसेच किरण सोनवणे, मोहन मगर,निनाद पाटील,सचिन भाकरे यांनी विलास सुरवसे यांच्या सोबतचे अनुभव सांगून त्यांना पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.

# महाराष्ट्रातही ई-चलनावरील ५० टक्के दंड सवलत लागू करण्याची मागणी



**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** कर्नाटक शासनाने प्रलंबित ई-चलनावरील दंडात ५० टक्के सवलत लागू केल्यानंतर महाराष्ट्रातही तत्सम निर्णय तात्काळ लागू करावा, अशी मागणी वाहतूक संघटना संयुक्त महासंघ, महाराष्ट्र राज्य यांच्या वतीने जिल्हाधिकाऱ्यांकडे निवेदनाद्वारे करण्यात आली आहे.

महासंघाचे प्रदेशाध्यक्ष रियाज सय्यद यांच्या नेतृत्वाखाली सादर करण्यात आलेल्या निवेदनात म्हटले आहे की, कर्नाटक शासनाच्या निर्णयामुळे हजारो वाहन चालक व वाहन मालकांना आर्थिक दिलासा मिळाला असून शासनाच्या महसुलातही वाढ होणार आहे. त्याच धर्तीवर महाराष्ट्र शासनानेही प्रलंबित ई-चलनावरील दंडात ५० टक्के सवलत जाहीर करावी.

10 डिसेंबर 2025 रोजी हिवाळी अधिवेशनात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी ई-चलनावरील दंड सवलती संदर्भात अभय योजना अंतर्गत समिती स्थापन करून तीन महिन्यांत निर्णय घेण्याची घोषणा केली होती. मात्र अद्याप याबाबत कोणताही शासन निर्णय (जी.आर.) जारी करण्यात आलेला नाही.

मागील दोन वर्षांपासून या मागणीसाठी सातत्याने पाठपुरावा सुरू असून शासनाकडे अनेक वेळा निवेदने सादर करण्यात आली आहेत. तरीही या निर्णयाची अंमलबजावणी झालेली नसल्याची खंत महासंघाने व्यक्त केली आहे.

राज्यातील लाखो वाहन चालक, ऑटो रिक्षा चालक, टॅक्सी चालक, मालवाहतूक चालक व वाहन मालक आर्थिक अडचणींचा सामना करत असल्याने शासनाने कर्नाटकप्रमाणे महाराष्ट्रातही ई-चलनावरील ५० टक्के दंड सवलतीचा निर्णय तात्काळ लागू करावा, अशी मागणी निवेदनातून करण्यात आली आहे.

या वेळी महासंघाचे प्रदेशाध्यक्ष रियाज सय्यद,महासचिव प्रदीप शिंगे,प्रभारी शहराध्यक्ष शंकर राऊत,इम्रान शेख,यासीन मुल्ला,मनोहर खांडेकर,अन्सार शेख व इतर पदाधिकारी उपस्थित होते.

# खा. डॉ. ज्योती वाघमारे यांचा सकल मातंग समाज महाराष्ट्र तर्फे सत्कार



**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** शिवसेनेच्या प्रवक्त्या प्रा. डॉ. ज्योतीताई वाघमारे यांची राज्यसभेवर बिनविरोध खासदारपदी निवड झाल्याबद्दल सकल मातंग समाज, महाराष्ट्र राज्य यांच्या वतीने आयोजित राज्यस्तरीय निर्धार मेळाव्यात त्यांचा सत्कार करण्यात आला.

माजी मंत्री उत्तम प्रकाश खंदारे यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या या मेळाव्यात विधान परिषदेचे आमदार अमित गोरखे आणि माजी मंत्री रमेश बागवे यांच्या हस्ते खासदार डॉ. ज्योती वाघमारे यांचा शाल, फेटा व पुष्पगुच्छ देऊन गौरव करण्यात आला. यावेळी माजी मंत्री दिलीप कांबळे, लक्ष्मणराव ढोबळे, माजी आमदार सुधाकर भालेराव, नामदेव ससाने, राजू आवळे,सुभाष जगताप, विजय अंभोरे, कैलास खंदारे, अण्णाभाऊ साठे यांचे नातू सचिन साठे, लहुजी शक्ती सेनेचे संस्थापक अध्यक्ष विष्णूभाऊ कसबे, कॉ. गणपत भिसे, डीपीआयचे प्रदेशाध्यक्ष अजिंक्य चांदणे, क्रांतिवीर लहुजी शक्ती सेनेचे संस्थापक शंकर तडाखे, अनिल हातागळे, लसाकम संघटनेचे प्रा. संजय गायकवाड, क्रांतिवीर लहुजी शक्ती सेनेचे प्रदेशाध्यक्ष सुरेश पाटोळे, लहुजी शक्ती सेनेचे पश्चिम महाराष्ट्र अध्यक्ष महादेव भोसले नगरसेवक प्रियदर्शन साठे, आदी मान्यवरांची प्रमुख उपस्थिती होती.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक सुरेश पाटोळे यांनी केले. सत्काराला उत्तर देताना खासदार डॉ. ज्योती वाघमारे म्हणाल्या, 'बहुजन समाजातून तसेच कामगार वर्गातून साहित्यसम्राट अण्णाभाऊ साठे यांना 'भारतरत्न' प्रदान करण्यात यावा, अशी मागणी गेल्या काही वर्षांपासून सातत्याने होत आहे. भारतरत्न पुरस्काराच्या निकषांवर विचार केल्यास ही मागणी तथ्यपूर्ण असल्याचे दिसून येते. त्यामुळे मी राज्यसभेत साहित्यसम्राट अण्णाभाऊ साठे यांना भारतरत्न देण्याची मागणी करणार आहे.' त्याचबरोबर अनुसूचित जातींच्या आरक्षणातील उपवर्गीकरणासंदर्भात सकल मातंग समाजाच्या शिष्टमंडळाची बैठक उपमुख्यमंत्री एकनाथराव शिंदे यांच्यासोबत घेऊन या विषयावर त्वरित निर्णय होण्यासाठी प्रयत्नशील राहू, असे आश्वासनही त्यांनी दिले.

या मेळाव्यास राज्यभरातून आलेले सकल मातंग समाजाचे समन्वयक आणि कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन टी एस क्षीरसागर, आभार प्रदर्शन किशोर जाधव यांनी मांडले.

# पर्यावरण दिनानिमित्त मुख्य डाकघर येथे वृक्षारोपण व स्वच्छता अभियान



**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** जागतिक पर्यावरण दिनानिमित्त प्रवर अधीक्षक डाकघर, सोलापूर विभाग आणि मुख्य डाकघर, सोलापूर यांच्या संयुक्त विद्यमाने रविवारी सोलापूर मुख्य डाकघर परिसरात वृक्षारोपण व स्वच्छता अभियानाचे आयोजन करण्यात आले. सकाळी ८ ते १० या वेळेत झालेल्या या कार्यक्रमात पर्यावरण संवर्धनाचा संदेश देत विविध देशी वृक्षांची लागवड करण्यात आली.

कार्यक्रमाची सुरुवात स्वच्छता अभियानाने करण्यात आली. यावेळी सोलापूर शहराच्या उपमहापौर तथा पर्यावरण रक्षक सौ. ज्ञानेश्वरी महेश देवकर प्रमुख पाहुण्या म्हणून उपस्थित होत्या. डॉ. मनोज देवकर, संस्थापक झ्र इको नेचर क्लब, आणि सौ. वर्षा खडकेकर हे विशेष अतिथी म्हणून उपस्थित होते.

यावेळी प्रमुख पाहुणे, प्रमुख अतिथी तसेच गार्डनर श्रीमती रमा गायगवळी यांचा नॅपकिन बुके देऊन सत्कार करण्यात आला.

प्रमुख पाहुणे व अतिथींनी पोस्ट ऑफिसला २० विविध जातींच्या देशी वृक्षांची भेट दिली. त्यांच्या हस्ते वृक्षारोपण करण्यात आले. तसेच डाक कर्मचाऱ्यांनी पोस्ट ऑफिस परिसरात आणखी १५ विविध प्रकारच्या वृक्षांची लागवड केली.

आपल्या मार्गदर्शनपर भाषणात सौ. ज्ञानेश्वरी देवकर यांनी मुख्य डाकघर परिसरात करण्यात आलेल्या वृक्षारोपणाची, त्याच्या योग्य निगेची व परिसरातील स्वच्छता अभियानाची प्रशंसा केली. तसेच मुख्य डाकघराच्या हेरिटेज इमारतीची पाहणी करून समाधान व्यक्त केले. कर्मचारी व ग्राहकांच्या सुविधांसाठी ओपन जिम तसेच महिला कर्मचारी व ग्राहकांसाठी हिरकणी कक्ष उपलब्ध करून देण्यासाठी प्रयत्न करण्यात येतील, असे त्यांनी सांगितले.

मनोगत व्यक्त करताना सौ. हर्षरेखा शाईवाले यांनी मुख्य डाकघरात झालेल्या विविध सुधारणा, स्वच्छता व कार्यक्रमाच्या उत्कृष्ट नियोजनाबद्दल कौतुक केले.

अध्यक्षीय भाषणात हेमंत खडकेकर यांनी कर्मचारी कल्याणासाठी सुधारित मनोरंजन कक्ष, प्रशिक्षण केंद्र, स्वच्छ कार्यालयीन परिसर आणि निसर्गरम्य वातावरण उपलब्ध करून देण्यासाठी विभाग सातत्याने प्रयत्नशील असल्याचे सांगितले.

कार्यक्रमास सोमनाथ काळे (वरिष्ठ डाकपाल, सोलापूर मुख्य डाकघर), प्रफुल्ल बंगाले (सहाय्यक अधीक्षक), संदीप घोडके (सहाय्यक अधीक्षक), राहुल शित्रे (तक्रार निवारण अधिकारी), श्रीरंग रेगोटी लेखापाल तसेच सोलापूर डाक विभागाचे सर्व कर्मचारी उपस्थित होते.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभार प्रदर्शन जे. आर. नरुटे यांनी केले. चहा-बिस्किटांसह कार्यक्रमाची सांगता करण्यात आली.